# काव्यकुंज

## विद्युत महिमा

विज्ञान जगत विद्युत भोवती ।
काढुन पहाती जग शुन्य ।।
विज्ञान प्रगती विद्युत भोवती।
चक्र फिरवी महाशक्ती जाळे पनती। १।
विद्युत मशनरी विद्युत भोवती।
बिना विद्युत मृत होती येते अवकळा। २।
आकाशी विमान पाण्यावर जहाज
जमिनीवर गाड्या पळवी विद्युत राणी। ३।
एसी, चित्र, दुरवाणी, माय त्यांची विद्युत राणी ।
विद्युत जाता मृत प्राय: पडती रणी । ४ ।
विज्ञान प्रगती मनुज हितसुख साधे ।
आजी मायेची विद्युत प्रेम न दुजे । ५ ।
विद्युत मशिनी जागवी मानवा तिन्हीपाळी ।
देवते समान हात जोडी मानव त्यांना । ६ ।
विद्युत श्रेष्ठ की, मानव हा जेष्ठ ।
विद्युत ही लेक मानवाची । ७ ।
रक्षण तिचे करा पुढच्या पिढीचा सहारा ।
चोरी नको तिची करा, टाळा हानी वंशजाची । ८ ।
विद्युत निर्मिती सम्यक हे कर्म ।
मानवी सेवा सत्य धर्म । ९ ।
सम्यक आजीवीका समाधान ।
देइ सुख जगती लेकरा महान । १० ।
वाहे गंगा विद्युत धारा निर्मल निसर्ग झरा ।
नाही कपट दुष्टता सेवा अविरत करा । ११ ।
निर्मितीचे क्षेत्र मा पृथ्वी समान फिरे जनीत्र ।
तीन हजार फेरे फिरे मिनटा मध्ये । १२ ।
अन्न, वस्त्र, निवारी , विद्युतचे काम भारी ।
नाही मिनटाचाही विलंब सहन जग करी । १३ ।
अनर्थाचे छेडणे सहन होत नाही विद्युतला ।
मारुन टाकण्याचीही पर्वा करीत नाही मानसाला । १४ ।
बहुजनहित बहुजन सुख तिच्या पदरात पुण्याईला ।
मनोरंजनातही काय कमी आहे तिचा बोलबाला । १५ ।
डॉक्टर, वडील, ॲक्टर, इंजिनिअर, लेखक, कवि, मोठे ।
विद्युतचा साथ त्यांना घडविण्यात पदोपदी होते । १६ ।
दवाखाना चिकित्सा विद्युत उपकरणाने होते ।
जीवनदान मानवाला विद्युत वरदान ठरते । १७ ।

**ना. द.गेडाम**
प्रभारक श्रेणी-२
कोराडी औ.वि.केंद्र



## आषाढ अवस

कांदेनवमीच्या भज्यांचा वास कोणा नाका झोंबत न्हाई
आखाडातल्या सरत्या दिसाची आठवण कोणा येत न्हाई।।

एके रात्री घेता घेता ते दिवसाची सय आली
चखणा खूप तिखट होता म्हणून मला उचकी आली ।।

ते दिवसाची सय येऊन मन माझं मोहरुन गेलं
मोकळिकीची आठवण येऊन अंग माझं थरारुन गेलं ।।

पिण्यात मश्गूल झालो मी, खाण्याची आठवण झाली न्हाई
मोकळिकीची आठवण येऊन, गलासात डुबून गेलो मीही ।।

अवतीभवतीचे पियक्कड सगळे, शुध्दीत नव्हते कोणीसुध्दा
अवसेची मोकळिक घेतल्यावर तर दोस्तांना सुधऱ्हायली न्हाई ।।

फोटोतल्या मला इसरले सगळे, हारावर का कोणाचे भागते
वास गटरीचा कि गलासाचा असो, निवद मला कुणी दावला न्हाई ।।

**भा.शं.सप्रे**
निम्नस्तर लिपिक
मुख्यालय, मुंबई